म. ग्रं. सं. ठाणे



# निर्वासित चिनी मुलास



# निर्वासित चिनी मुलास

अनिल

REFBK-0006420
REFBK-0006420

६४२०

जीवनसाहित्य : ५

आत्माराम रावजी देशपांडे, 'अनिल'

जन्म ११ सप्टेंबर १९०१

भावगीतांचा संग्रह—फुलवात १९३२

मुक्तछंदातील काव्य—प्रेम आणि जीवन, प्रतिभा विशेषांक १९३५

भग्नमूर्ति १९४२

निर्वासित चिनी

लेखनकाल, चीन दिन ७–३–४२ ते २७–३–४२

प्रथम प्रकाशन, भवितव्य, मे दिन विशेषांक. १९४२

पुस्तकरूपानें जुलै १९४३

सर्वाधिकार लेखकाधीन, प्रथमावृत्ति १९४३

प्रकाशक—पुरुषोत्तम आत्माराम चित्रे, खारीबाव, बडोदें.

मूल्य १ रुपया

ता.
ठाणे
ग्रंथालय ठाणे
५४२०

अजुनीहि नच हालती माझ्या दृष्टीसमोरून
कावरें बावरें भेदरलेले
न[illegible] डोळे
आंत कोंडलेल्या अश्रूंच्या दाबाने
सुजलेले आणि पुढे आलेले !
फुटणार जणू डोळ्यांचा बांध
आत्ता ह्याच क्षणीं
—त्याच्या पूर्वीचाच निमिषार्ध हा—
आणि वाहणार अश्रूंचा पूर
बेफाम वेगें हुंदके देत !

परकाष्ठेची असहायता
मूर्तिमंत तूं चिमण्या बाळा !
किंचाळून कोणा माराया हाक
उघडिलेस सोनुलें मुख

दाखवीत दूधदात आपुले ?
दूर तेथे कोठे दिसलें कोणी ?
" आई, अहो बाबा, दादा, ताई ग
हा मी येथे आहे
कसे तुम्ही मला सोडून गेलां ?"
असा आर्तस्वरें फोडीत टाहो
धाव घेणार तूं आत्ता त्यांच्याकडे ?
चमकून त्या आशेची धडक
गेली का तुझ्या हृदयांतून
आणि राहिले डोईवरले
जावळे केसहि विस्फारून उभे ?
दुसऱ्या क्षणींच पण दिसलें
धडधडलें हृदय पुन्हा
धुकधुकी होऊं लांगली क्षीण
" छे–नाहीत–ते–आई बाबा दादा
दुसरे कोणी...
अरे देवा रे !
कोठे शोधूं मी आता तयांना ?"

असें ओरडून धाय मोकलीत
लोळण धुळींत गडबडा घेत
टाकिलेंस अंग धरणीवरी !

धरणीमाता... !
स्वर्गाहून गरीयसी अशी ती
तुझी जन्मभूमि !!
तीहि बिचारी
असहाय दीन तुझ्यासारखी
पददलित आक्रमिलेली
तुला पोटाशीं घेणार कशी !
तिच्या जेत्यांनी
चिरून तिचें पोट त्या आंत
भरलीं आहेत तिचीं मृतबाळें
तिचे शूर पुत्र आणि शूर कन्या
सहस्रावधि
तिच्यासाठी ज्यांनी देह ठेविला !

ऊठ ऊठ बाळा
रडून आता होणार कसें ?
कोण करणार तुला साहाय्य ?
दूर जीं तुला दिसलीं आता
नाहीत बरें तीं कोणी माणसें
आहेत तीं भुतें
साम्राज्याकांक्षेने उभीं केलेलीं
चेकाळलेलीं
—तूं ज्या बाळपणीं ऐकिसी गोष्टी
त्यांतलेच हे क्रूर राक्षस
आलेत शोधीत नरबलींना
त्यांच्या पोलादी यंत्रदैत्यासाठी !
आणि बघ त्या राक्षसांहूनीहि
आहेत हे सारे अतिभयंकर
ह्यांना ना हृदय अथवा डोकें
आहेत सारीं हीं जिवंत धडें
धडधडणारीं यंत्रांसारखीं
पोलादी बाहुलीं कळसूत्रांचीं—



सैनिक हे तुझ्या शत्रुराष्ट्राचे !
तुला जे वाटले आपले आप्त
आहेत दुसरीं कोणी माणसें
तुझ्या देशाचींच कैद केलेलीं
आहेत त्यांना घेऊन जात
वधस्थलाकडे !
चल काढ आता येथून पळ
चिमण्या पायांत शक्ति ना जरी
लपून राहा कोठे रानीं वनीं
दृष्टीसहि ह्यांच्या पडूं नको बरें !
नाही तर हे नरराक्षस
तुलाहि घेऊन खास जातील
काढून घ्यायला तुझ्या अंगांतील
तान्हें रक्तहि !
पाहिजेच आहे तेंहि तयांना
त्यांच्या शस्त्रहत सैनिकांसाठी
टाचीं द्यायला !!

मराठी
923

अरे, पोरक्या चिनी बालका !
घरादारांना पारखीं झालीं
सोडून दिलीं आईबापांनी
ताटातूट झाली अशीं हीं किती
आहेत बालकें तुझ्यासारखीं
भटकत वणवण निर्जनांत !
सहस्रांनी आहे गणना त्यांची
कित्येक बिचारीं अन्नपाण्यावीण
आक्रंदत आणि तडफडत
रडत मेलीं !!

बाळा, तुझ्या त्या आईबापांना
दोष देसी का ?
नको – नको – बरें !
नाही का माहीत काय झालें तें ?

तुझ्या गावावर पातली जेव्हा

शत्रूची धाड
धाड धाड पडूं लागले गोळे
तुझा पिता तेव्हा
सुपुत्र आपल्या मायभूमीचा
तुझ्या देशाच्या शूर सैन्याला
कराया मदत शक्य ती सर्व
धावून गेला
घेऊन हातांत स्फोटक गोळे
मिळेल तें शस्त्र
लपतछपत वृकयुद्धांत
जर्जर करीत शत्रुसैन्याला
कित्येक जे होते सरसावत
लुटीच्या आशेने लालचावले
लोळविलें त्याने तेथेच त्यांना
...पण दैवगति !
दिसला तो एका नेमबाजाला
अचूक धरून निशाण त्याने
सोडिली गोळी

थेट डोक्यांतच शिरली त्याच्या !
लख्खकन् त्या शेवटल्या क्षणीं
दिसली त्याला
तुझी आई आणि तुम्ही सर्वेहि
— आणि तूंहि बरें ! —
आणि गेला त्याचा प्राण निघून !
शरीराची माती
मातींत पडली त्याच्या देशाच्या ! !

तुझी माता बाळा ... !
तशा भयंकर रणकंदनांत
हातघाईच्या कापाकापींत
फिरतच होती स्वयंस्फूर्तीने
घायाळ लोकांना वाहून नेत
शुश्रूषास्थलीं...
कित्येक तिने वाचविले जे
पडले होते तडफडत

गडगडत्या रणगाड्याखाली
चिरडून जे असते मेले...
अशाच एका
पाठीवरती वाहून नेतां
क्लान्त झालेली ती पडली खाली
मूर्च्छा येऊन
चुराडा करीत दोघांचाहि त्या
रणगाडा गेला धुमश्चक्रींत !
अरे ! जे तुम्ही
तिच्या जीवनाचें सर्वस्व होतां
त्यांच्या आठवाचें अंतिमसुख ...
तेंहि न मिळालें तिच्या जात्या जीवा !

तुझे ताई – दादा !
तुमच्या दुर्दैवें विजयी होतां तुमचा शत्रु
प्रतिकार तेव्हा सर्व थांबला
भेसूर सर्वत्र झाली सामसूम

धुंद झालेले जेते शिपाई
गल्लीगल्लींतून हिंडूं लागले
शोधीत सैतानी वासनातृप्ति !
नुकतेंच जिने यौवनांत होतें केलें पदार्पण
अशी तुझी ताई !
हुडकून त्यांनी काढली तिला
तुझ्या घरांतून...
तुझ्याहून मोठा थोडासाच तो
तुझा दादा दहाबारा वर्षांचा
उसळलें त्याचें पोररक्तहि
धावून गेला त्यांच्या अंगावर
" खबरदार ! सोडा ताईला
लावाल जरी अंगाला हात..."
" काय करणार कारट्या रे तूं ?"
दात विचकीत हासले सारे
मुर्दाड शिपाई...
घेऊन गेले दोघांनाहि कोठे
ओढत आणि फरफटत

अज्ञात स्थलीं !
तुला कसें सांगू—पुढे काय झालें... !

लपवून तुला ठेविलें होतें
त्यांनी ज्या जागीं
राहिलास तूं तेथेच बाळा !
तुलाहि नेतील पकडून ते
वाटून अशी मनांत भीति
त्यांनी नाही तुला हाकहि दिली
नुसतें पाहिलें आकाशाकडे !

कोसळलें तें आकाशच आता
तुझ्यावरती !!

वाट पाहून कंटाळलेला
आणि भ्यालेलाहि एकटेपणें

आलास तेथून बाहेर जेव्हा
कानोसा घेत
भिरभिर भेदरल्या डोळयांनी
रिकाम्या घराचे कोनेकोपरेहि धुंडाळिलेस
" आं—कोणीहि नाही—कोठेहि नाही !
गेले तरी कोठे सारे येथून
सोडून मला... "
आणि नंतरचा तुझा आक्रोश
—चिमण्या पिलांची घरट्यांतल्या
माय कोठे दूर गेली असतां
पडली कोणाच्या छऱ्यांला बळी
घरीं न परते सांजवेळेला—
पिलांचा जसा चिवचिवाट...

चेकाळून त्या आक्रोशांतच
सुटलास सैरावैरा पळत
जिकडे तिकडे पाहिल्यास तूं

आगी लागलेल्या
कानांत भरून भीतीचे वारे
पळालास धूम
अंधाराचीहि वाढत्या नाही
वाटली भीति
जळत्या घरांच्या उजेडाची जशी !
दूर एखाद्या दरडीमध्यें
काढिलीस रात्र
नीज आली अर्धमेल्यासारखी...
कशाला आता आला तुला जाग ?
कोणती सकाळ दिसणार आता
तुला जीवनाची ?
कोणता दिवस उजाडणार
तुला आशेचा
आणखी उज्ज्वल भवितव्याचा ?

अशीच झाली ना बाळा ताटातूट
तुझी आणि तुझ्या आईबापांची

ताई-दादांची ?
की काणी होते ते भ्याड नादान
की जे स्वप्राणा कवडीमोल वांचवावया
मरणाआधीच मृत झालेले
पळाले तुलाहि सोडून मागे
पोटच्या पोरा
" प्राण सलामत आपले तरी
पन्नास पोरें "
असा करीत षंढ विचार ?
असोत तसेहि !
तयांनाहि देऊं नकोस दोष
जीवन आहेच सर्वांना प्यारें
असो शूराचें, असो भ्याडाचें !
तरीच आहे जीवनशक्ति... !
अरे ! जीवनाचा एकेक क्षण
पृथ्वीवर ह्या जो लाभतो आहे
आहे तोच आत्यंतिक मोलाचा

शूरांनाहि हें पटतें अखेर
प्राण जातांना !
उन्मत्तपणें हें जीव घेणें देणें
मांडतात जे
त्यांचीच आधी सडकून डोकीं
जग नांदेल कधी धडपणें ?...

दोष तरी तूं द्यावा कोणाला ?
कोण ह्या तुम्हा बालकांचे खरे
घोर अपराधी
ठाऊक नाहीत बाळा ते तुला !

अरे ! ते ऐदी ऐष-आरामांत
बसलेत प्रास तूपपोळी खात
लोळत सोन्याच्या मंचकावरी
तुझ्या देशाची पेटवून होळी

भाजून त्यावर पोळी आपली
विकून तुझ्या शत्रूंना गोळ्या
माखल्या त्यावर तुपाने पोळ्या
युद्धसामग्रीचा प्राणघेऊ ज्यांनी
व्यापार केला
मिळविले ज्यांनी अपरंपार
सुवर्णधन
आणि त्यावर प्राण पुष्ट केले
केला गारीगार तळीरामहि
तेच तुझे खरे घोर अपराधी
दोष दे त्यांना !

अरे ! जे घोकीत शांततापाठ
निर्लज्ज शठ
उभा करूनी पोकळ देखावा
जगदैक्याचा राष्ट्रसंघांत
बसले होते आपला केवळ स्वार्थ साधत

बोलत गोष्टी शस्त्रसंन्यासाच्या
निच्चळ ओठें
गुपचूप होते वाढवीत नित्य
संहारशक्ति शस्त्रें आयुधें
आणि डोळ्यावर कातडें ओढून
दुर्लक्षीत होते त्यांच्या जे लीला
हेतु ठेवूनी वेगळा कांही
आणि ज्यांच्या जिभा
टाळूलागीच चिकटून गेल्या
होतां आक्रमण तुझ्या देशावर
बहिरे झाले जयांचे कान
आपलें द्रव्यच मोजीत पुन्हा
हात राहिले खिशांतच ज्यांचे
त्यांच्या इजारींच्या
तुझ्या देशाच्या गळ्याला लागला असतां फास
सोडीत होते जे नुसते श्वास
तेच तुझे खरे घोर अपराधी
दोष दे त्यांना !

अरे ! ती तुझी मृत सम्राज्ञी
तुझ्या देशाच्या दौलतीचा जिने
गरिबांपासून पिळून काढल्या करभाराचा
रंगेल केला कलाविलास !
बांधायासाठी युद्धनौका जो
पंतप्रधानाने पैसा वांचविला
त्याच पैशाने
हस्तिदंती जिने घडविली छान
आरामनौका !
चिनी कौशल्याचा ताजमहाल
मोत्यांच्या झालरी आणि रत्नांचे
चित्रबंध जींत
सोन्यांत केलेलें काम मिन्याचें
घडवीत होते अत्यंत कुशल
कारागीर जी कित्येक मास
अशी ती नौका
सम्राज्ञीच्या शाही तलावांत जेव्हा
फिरूं लागली

पंतप्रधानाने पाहून तिला
मारून घेतला कपाळीं हात
उद्वेगाने आणि बोलला, "अहो !
उद्या जरी चाल करून आलें
बलाढ्य जपानी आरमारहि
आमच्या महासम्राज्ञीचें हें
कलाढ्य सुसज्ज रम्य आरमार
मुकाबला छान करील त्याशीं
कशाला काळजी बचावाची आतां ?"
असे जे नादान सम्राट तुझे
तेच खरे घोर तुझे अपराधी
दोष दे त्यांना !

आणि युद्धदेव तुझ्या देशाचे
ज्यांनी आपल्या स्वार्थी आकांक्षा
पूर्ण कराया
सर्वसत्ताधारी व्हायाच्या उन्मत्त ईर्षेने ज्यांनी

माजविलीं रणें आपसांतच
एका हाताने कापिला ज्यांनी
देशाच्या देहाचा दुसरा हात !
अंदाधुंद लूटमार करूनी
संपन्न भूमीचें वैराण रान
जयांनी केलें
निजबांधवांच्या रक्ताचे लोट
वाहवून ज्यांनी
त्यांच्याच भूमीला स्नान घातलें
घालीत अखेर लोटांगणें आणि
शत्रूलाहि जे शरण गेले
त्याच्या बळावर प्रबळ व्हाया
तुझ्या देशाचें मनुष्यबळ
हतबल ज्यांनी स्वतःच केलें
तेच तुझे खरे घोर अपराधी
दोष दे त्यांना !

आणि जे लढत असतां देश
चढत आहेत सिंहासनावरी
शत्रूने घेतल्या मुलुखाचे जे
उल्लूक बनत आहेत राजे
पुत्रक-नृप
तुझ्या देशाच्या ध्वजावरल्या
माध्याह्नसूर्याचा प्रकाश ज्यांना
पाहावेना क्षणभरहि डोळां
शत्रूच्या कृपाप्रसादाचा ज्यांना
बंदीखानाहि वाटे प्रासाद
त्यांच्याच अखंड मायभूमीची
खांडकीं करून शत्रूने जरी
टाकलीं हाडकें ह्यांच्यासमोर
तींहि चघळीत आहेत जे श्वान !
तेच तुझे खरे घोर अपराधी
दोष दे त्यांना !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ६४२०
संदर्भ शाखा (स्थळ प्रत

आणि दे दोष आम्हालागीहि
आम्ही जे तुझे शेजारी आहों
चाळीस कोटींचा विस्तार ज्यांचा
नुसताच भार भूलागी असे
परिस्थितीचे दास जे आम्ही
साहाय्यास तुझ्या येऊं न शकूं
हिमालयाहूनि आहे जयांच्या
थंड हृदयांचा पर्वत मोठा
तुझ्या देशांतील आगेची आच
अजूनीहि जया नाही लागली
आणि जयांची प्रवृत्तिगंगा
अजून आहे मानसांतच
गारठलेली
वाट पाहात न जाणे कोण्या
भगीरथाची... !

हें जीर्ण जग !
जगत आहे जें जगूं न देतां एकामेकांना

असता विपुल सर्वांना जागा
पृथ्वीच्या पाठीं नांदाया सुखें
जमिनीसाठी दुसऱ्यांच्या जें
हपापून आहे लढत नित्य
कमीनपणें
मरत आणीक करीत सर्वांना
जमीनदोस्त !
संपन्न समृद्ध असता सृष्टि
जीवनोपयोगी धनधान्याने
माजविली आहे कृत्रिम ज्यांत
उपासमार
पिकवायाची फिकीर न ज्या
विकायाची मात्र अशा चोरांनी
गळेकापंच्या चढाओढींत...
मानीव मोलाच्या सुवर्णालागी
मानवी प्राणांपेक्षांहि मोल
विकत घेतात मौक्तिक जेथे
कीटकजन्य

श्रमजन्य घर्मबिंदूंचे मोती
मातीमोलाने
आणि दगडांच्या पोटचीं रत्नें
यत्नावीण घेती सवंग अशा
कष्टोपजीवींच्या उत्पादनाला...
अर्थशास्त्राचा अनर्थ असा
चालला ज्यांत
प्रमत्तांच्या हातीं ज्यांतील सत्ता
अक्कल गहाण भांडवलांत
त्या जीर्ण जगा
अवास्तवाला कवटाळल्याची
झिडकारल्याची आणि वास्तवाला
ही घोर शिक्षा
भेसूर युद्धाची
जेत्यांना आणि पराजितांना
उभयतांनाहि मरावयाची !

होवो तरी आता एकदाचा त्या
जीर्ण जगाचा
आणि अमानुष मरणोन्मुख
संस्कृतीचा त्याच्या सर्वेंच त्याच्या
निःशेष अंत !
खंत नच त्याची आता आम्हाला
गाळायास नाही एकहि अश्रु
आहोंत आम्ही करीत गोळा
लाकडें त्याच्या सरणासाठी
अधीर झालेले आहोंत किती
पेटवायाला तयाची चिता...
चिन्ता हीच की
ठरो हें युद्ध शेवटचें त्याचें
अखेरचीच त्याची धडपड
चुकूनहि नच ह्यांतून वांचो ! !

त्या जीर्ण जगाच्या चितेंतूनच
उडणार आहे अमर पक्षी

नव्या स्थितीच्या नव व्यवस्थेच्या
नव, आदेशाचा नवाकांक्षांचा
घेत जगदंड स्वपक्षांखाली...
नाही तो कोमल कपोतदूत
युद्धान्ताच्या आणि उद्भवणाऱ्या
त्यांतूनच नव्या युद्धारंभाच्या
मध्यकाळांतील दुबळी शांति
घुमविणारा...
युद्धाचें निमित्त मतंगज जे
त्यांना उचलून स्वपंज्यांमध्यें
दूर अंतराळीं भिरकाविणारा
आहे तो प्रबळ शांति-भिरुंड
नव्या जगाचा !

नवें जग जें
जागणार आहे जन्मून आता
स्वातंत्र्य-समता-बंधुत्वाच्या तें

बोलणार नाही बोबड्या गोष्टी
वास्तवतेचा सर्वस्वतेचा
आणि निकराचा बंधुभाव जो
कणाकणांतून नव्या रक्ताच्या
मानवतेच्या नाचवील तें
उसळेल तो चेतना देत
नव्या शक्तींना
निर्मितील ज्या सम अर्थांचें
नवें सामर्थ्य
उपभोगील जें सारखेपणें वांटून घेत
सर्वांची सृष्टि
कृपाप्रसादाचीं फळें आणि तिच्या
सेवेचे कष्ट !

नवें जग तें... !
ज्यांत न होतील मानव धनी
अथवा दास मानवांचेच

परकष्टावर पुष्ट व्हायाला
ज्यांत ना जागा
मात्र भरपूर सहश्रमाच्या
सहजीवनांत नांदावयाला
विक्रम जेथे न म्हणेल कोणी
पराक्रमाला आक्रमकांच्या
मिळेल ना त्याला कोठेहि थारा
आणि मानवाला बांधावयाला
चीनच्या भिंती
उरेल न भीति मानवांचीच
संहाराचे शोध लावे जी बुद्धि
करील ती उभा सर्वांच्यासाठीं
मानवहिताचा समाहाराचा
नवा संसार !!

तें जग नवें
बाळा, तुझ्या ह्या आर्त हाकेने

व्याकूळ होऊन येणार आहे
सांभाळ कराया सदाचा तुझा
त्यांतच आहे उजाडणार
दिवस तुला
आशेच्या उज्ज्वल भवितव्याचा
धीर धर थोडा !
घेणारच आहे तुला तें पोटीं
तूंच त्याची शक्ति
आणि उमाळा...
तुझ्याचसाठीं
बाळा, ह्या नवीन जगाच्या गोष्टी !
हीं तुम्ही बाळें
तुम्हीच आहां नांदणार त्यांत
आणि तयाला नवीनपणांत नांदविणार !
—येणारच आहे—येतच आहे—
—आलेंच पाहा !—
तें नवें जग...
नवें जग तें नव आशांनी हासविणारें

क्षणभरहि साहणार नाही
पाहाणार नाही तुझे हे डोळे
असे भ्यालेले
पूस आता आसूं आणि हास बरें !
–नको—नको—पण—थांब—थोडासा
पाहूं दे पुन्हा ह्या जीर्ण जगाला
आपल्या आसुरी कर्मांचीं फळें
कावरेबावरे भेदरलेले
ते तुझे डोळे ! !

# टिपणें

| | |
|---|---|
| स्फोटक | : हॅन्ड् ग्रेनेड्स् |
| नेमबाज | : स्नायपर् |
| रणगाडा | : टँक् |
| मृतसम्राज्ञी | : डॉवेजर् एम्प्रेस् लँग यू |
| युद्धदेव | : वॉर् लॉर्ड्स् |
| पुत्रक-नृप | : पपेट् किंग्ज् |
| अमरपक्षी | : फीनिक्स् |
| शांति-भिरुंड | : 'गंड-भिरुंड' ह्या मूळच्या शब्दावरून. गंड-भिरुंड हा एक भारतीयांचा काल्पनिक प्रचंड पक्षी आहे. हा एवढा प्रचंड आहे कीं, एका पंजांत दोन दोन हत्ती धरून उड्डाण करीत आहे असें ह्याचें |

चित्रण असतें. ह्याचें चित्रण जवळपास म्हणजे रामटेकच्या पुरातन अवशेषावर पाहावयास मिळेल. गड-भिरुंड हा शब्द मूळचा कानडी असावा.

REFBK-0006420

REFBK-0006420

या पुस्तकाचें वेष्टन, त्यावरील चित्र व मुद्रणाचे संयोजन
चित्रकार दत्तात्रय गणेश गोडसे ह्यांनीं केलें आहे
ह्या पुस्तकासाठीं जुन्नरचा हात-कागद वापरला आहे
मुद्रक : मंगेश नारायण कुळकर्णी, कर्नाटक प्रिंटिंग प्रेस,
कर्नाटक हाऊस, चिराबाजार, मुंबई, २.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
६४२०